# महान क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद

**भारताच्या** स्वतंत्र संग्रामामध्ये अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले.यामध्ये प्रामुख्याने क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नाव मोठ्या अभिमानाने आजही घेतले जाते.त्याचप्रमाणे अल्पवयात देशासाठी लढा उभारणारे महान क्रांतिकारक म्हणून चंद्रशेखर आझाद यांची ख्याती आहे.चंद्रशेखर आझाद यांचा जन्म २३ जुलै १९०६ ला मध्यप्रदेशातील झाबुआ(अलिराजपूर)जिल्ह्यातील भावरा या गावी झाला.जन्मताच त्यांच्या हृदयात क्रांतिची जोत लखलखत होती.त्यांचे प्राथमिक शिक्षण भावरा या गावात झाले.परंतु आईच्या इच्छेनुसार ते वाराणसी येथील संस्कृत पाठशाळेत शिकत असताना सुद्धा त्यांच्यात क्रांतीची ज्वाला धकधकत होती.चंद्रशेखर आझाद यांचे बालपण भिल्ल जमातीच्या वस्तीत गेले त्यामुळे ते धनुष्य बाण उत्तम रीतीने चालवत म्हणजेच त्यांच्यात बालपणापासून लढवय्य व क्रांतिकारक वृत्ती होती. १३ एप्रिल १९१९ रोजी झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांड घटनेचा चंद्रशेखर आझाद यांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला.त्यानंतर चंद्रशेखर आझाद १९२० मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील असहकार चळवळीचा एक भाग बनले आणि वयाच्या १५ व्या वर्षी त्यांना अटकही झाली.अशा परिस्थितीत ब्रिटन न्यायालयाने या छोट्याशा मुलाला १२ फटक्यांची अमानुष शिक्षा दिली.चंद्रशेखर आझाद यांचे मुळ नाव चंद्रशेखर सीताराम तिवारी होते.परंतु बालवयातील अमानुष शिक्षा पहाता ब्रिटिश न्यायालयात नाव नोंदविताना आपले आडनाव आझाद असल्याचे नोंदविले.तेव्हापासुन संपूर्ण हिंदुस्थानात चंद्रशेखर आझाद नावाने ओळखले जाऊ लागले.फटक्यांनी आझादांच्या मनात क्षोभ वाढुन तळपायाची आग मस्तकात गेली आणि त्याच क्षणी त्यांचा अहिंसेवरील विश्वास उडाला व क्रांतिकारक झाले.आझाद यांचा क्रांतीकारी हेतू पहाता १९२२ साली महात्मा गांधीनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले.त्याचे आझाद यांना खुप वाईट वाटले.अशा परिस्थितीत त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वातंत्र्य करण्याची शपथ घेतली.पुढे त्यांची भेट हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली व क्रांतीची ज्योत आणखी प्रज्वलित झाली.क्रांतीची ज्वाला संपूर्ण भारतात पसरविण्याच्या दृष्टीने मातृभूमीच्या रक्षणार्थ अनेकांना आंदोलनात सहभागी होण्यास प्रेरित केले.इंग्रजांना आर्थिक दृष्ट्या कमजोर करण्याच्या हेतूने व क्रांतिकारकांची भिती इंग्रजांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने आझाद यांनी आपल्या बळावर काकोरी ट्रेन लुटली आणि व्हाइसरॉयच्या ट्रेनला उडविण्याचा देखील प्रयत्न केला.इंग्रजांच्या असेम्ब्लीत बॉम्ब फोडण्याच्या घटनेत चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांना पुरेपूर मदत केली.चंद्रशेखर आझाद हे भगतसिंग यांचे मुख्य सल्लागार होते.भगतसिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आझाद यांनी भरपूर प्रयत्न केलेत.अशा परिस्थितीत इंग्रजांना नेहमी प्रमाणे चकमा देतच होते.दिनांक २७ फेब्रुवारी १९३१ रोजी अलाहाबाद मधील अल्फ्रेड पार्क येथे राजगुरू हे जेलमध्ये असतांना त्यांच्या आईला आर्थिक मदत व्हावी यासाठी ते एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी गेले असता, एका अज्ञात खबऱ्याने इंग्रजांना चंद्रशेखर आझाद असल्याची वार्ता दिली आणि मोठा घात झाला. इंग्रजांना वार्ता मिळताच मैदानाला वेढा घातला. अशा परिस्थितीत चंद्रशेखर आझाद व इंग्रज सैन्य यांच्यात गोळीबार झाला.अशावेळी आझाद यांनी तीन इंग्रजांना धाराशाही केले. आपल्या जवळच्या गोळ्या संपत आहे हे त्यांच्या लक्षात आले. अशा परिस्थितीत त्यांना इंग्रजांच्या हातुन मरने पसंत नव्हते शेवटच्या गोळीने स्वतःला मारून घेतले आणि क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी शहीद झाले. भारत स्वतंत्र होण्यासाठी ज्यांनी कशाचीही पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली अशांमध्ये आघाडीवर घेतले जाणारे नाव म्हणजे क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व देश स्वतंत्र झाला.त्यामुळे त्यांच्या बलिदानाची पावती आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी देणे गरजेचे आहे. देशातील राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की देश स्वतंत्र करण्यासाठी क्रांतिकारकांनी घरदार सोडून,आपला परिवार सोडून आणि आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली.त्यांची पुर्तता करण्याचे काम आज राजकीय पुढाऱ्यांचे आहे.कारण देशातील जनता सुखी-समृध्दी आणि समाधानी रहावी म्हणून देश स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी लढा उभारला होता.आता देश स्वतंत्र झाला आहे तरी देशात बेरोजगारी, भुकमरी,महागडे शिक्षण, रोजगार या सर्वांचा सामना गरीब व सर्वसामान्यांना करावा लागतो आहे.आज १४० करोड लोकसंख्येच्या देशात करोडोंची संपत्ती आहे यात दुमत नाही.परंतु मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी (आजी-माजी आमदार-खासदार, मंत्री,लोकप्रतिनिधी) देशांच्या करोडोंच्या संपत्तीवर आपली पकड मजबूत ठेवली आहे.यामुळे हा पैसा १४० कोटी जनतेपर्यंत पोहचत नाही.यामुळे आर्थिक उलाढाल खोळंबत आहे व यातुनच देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होतांना दिसतात व याचा फटका सरळ सर्वसामान्य व गरीब लोकांना भोगावा लागत आहे.त्यामुळे दिवसेंदिवस गरीब हा गरीब होत आहे तर श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांना माझी विनंती आहे की क्रांतिकारकांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले त्याचा फायदा गरीब व सर्वसामान्यांना व्हावा या उद्देशाने कार्य केले पाहिजे. त्याचबरोबर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करून देशाच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे.तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांकडुन क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना खरी श्रद्धांजली ठरेल.त्याचप्रमाणे देशात वाढते प्रदुषण पहाता क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवेत.यामुळे संपूर्ण देशात वातावरण प्रफुल्लित राहील व ऑक्सिजनची मात्रा वाढेल आणि मुख्यत्वेकरून या दिवशी केलेले वृक्षारोपण अनंत काळापर्यंत आपल्याला ग्यात राहिल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व मुळांमध्ये आपल्याला क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांची क्रांतीची ज्वाला धकधकतांना दिसेल. क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# आरक्षण मंजूर; तरी धग कायम...

**मुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मुंबईतील दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला चरणस्पर्श करून मराठा समाजाला आरक्षण मिळवून देणारच, असे ठाम आश्वासन दिले होते. राज्य विधिमंडळाचे त्यासाठी एक दिवसाचे विशेष अधिवेशन बोलावून मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण देण्याचा विधानसभा व विधान परिषदेने एकमताने ठराव संमत केला. ठराव संमत झाल्यानंतर शिवसेना व युतीच्या समर्थकांनी गुलाल उधळून जल्लोष साजरा केला. मराठा समाजाला दिलेला शब्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाळला हाच संदेश सर्वत्र गेला. तरीही मराठा समाजाच्या आरक्षणासाठी गेले आठ महिने आंदोलन करणारे मनोज जरांगे-पाटील हे समाधानी नाहीत. आपण सरकारकडे जे मागितले ते मिळालेच नाही, असे ते वारंवार सांगत आहेत. पुन्हा एकदा सरकारला अल्टिमेटम देण्याची भाषा ते वापरू लागले आहे. एवढेच नव्हे, तर गावागावांत आणि जिल्ह्यांत 'रास्ता रोको' आंदोलनही त्यांनी घोषित

केले आहे.

गेल्या दहा वर्षांत राज्यातील तीन सरकारांनी म्हणजेच तीन वेगवेगळ्या मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजाला आरक्षण दिले, तिन्ही वेळा मराठा समाजाची लोकसंख्या व दिलेल्या आरक्षणाची टक्केवारी अगोदरपेक्षा कमी झाली. सन २०१३ मध्ये राज्यात पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राज्यात आघाडी सरकार होते. नारायण राणे समितीने मराठा समाजाची लोकसंख्या बत्तीस टक्के गृहीत धरून १६ टक्के आरक्षण दिले होते. सन २०१८ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली युती सरकारने मराठा समाजाला सरकारी नोकरी व शिक्षणात १२ व १३ टक्के आरक्षण दिले, तेव्हा मराठा समाजाची लोकसंख्या तीस टक्के गृहीत धरण्यात आली होती. आता एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या सरकारने मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण दिले आहे, पण लोकसंख्या अठ्ठावीस टक्के असल्याचे म्हटले आहे. मराठा समाजाची लोकसंख्या व आरक्षणाची टक्केवारी सतत घसरत आहे, हा सुद्धा अभ्यासाचा एक विषय आहे.

आठ वर्षांपूर्वी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यात ५८ मोर्चे निघाले. मुंबईतील मोर्चातही लक्षावधी मराठा समाज सहभागी झाला होता.




राज्यातील सर्व प्रमुख शहरांमध्ये व जिल्हा मुख्यालयात निघालेल्या मोर्चांमध्ये लाख दोन-चार नव्हे, तर पाच-सात लाखांवर मराठा सामील झाले होते. हे सर्व मूक मोर्चे होते. मोर्चात कुठेही घोषणा दिली गेली नाही, पण मोर्चातील लक्षावधी लोकांच्या सहभागाने मराठा समाजाने विराट शक्तिप्रदर्शन घडवले होते. अत्यंत शांततेने आंदोलन कसे करायचे व आपल्या समाजाची ताकद कशी दाखवून द्यायची, याचा एक आदर्श 'मराठा क्रांती मोर्चा'ने सर्व देशाला दाखवून दिला होता. मराठा आरक्षणासाठी आंदोलनाची सुरुवात छत्रपती संभाजीनगरमधून झाली. दि. ९ ऑगस्ट २०१६ रोजी पहिला मोर्चा निघाला होता. त्यानंतर राज्यात ५८ मोर्चे निघाले. आरक्षणाच्या मागणीसाठी काकासाहेब शिंदे या तरुणाने कायगाव टोका येथील गोदावरी नदीच्या पात्रात आत्महत्या केल्याने आंदोलनाची तीव्रता वाढली. मात्र राज्यात निघालेले सर्व मोर्चे शांततेने पार पडले, या सर्व विराट मोर्चांची आंतरराष्ट्रीय पातळीवरही दखल घेतली गेली.

मराठा आंदोलनासाठी जरांगे-पाटील यांनी आंदोलन सुरू केल्यापासून राज्यातील वातावरणच बदलले आहे. जरांगे-पाटील यांच्या मागणीला कोणी समोरून विरोध करीत नाहीत आणि विधिमंडळातही त्यांच्याविरोधात कोणी बोलले नाही. मराठा व्होट बँक अठ्ठावीस टक्के आहे हे मान्य केले, तर मराठा समाजाला दुखवणे हे कोणत्याच राजकीय पक्षाला परवडणारे नाही. मागणी होती ओबीसीतून कुणबी म्हणून टिकावू आरक्षण मिळावे, तशी मागणी पूर्ण झाली नाही. दहा टक्के आरक्षण दिल्याने आता ईडब्ल्यूएसचा लाभ मराठ्यांना मिळणार नाही, चलो मुंबईचा नारा देत लाखो मराठा मुंबईच्या वेशीवर वाशीला नवी मुंबईत येऊन थडकले, त्यांना जीआरची प्रत दाखवली गेली, अपेक्षेप्रमाणे लाभ झाला नाही, विधिमंडळात आरक्षण देताना कोणीही सगेसोयरे शब्दही उच्चारला नाही. मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले गेले नाहीत, असे अंतरवाली सराटीतून वृत्तवाहिन्यांच्या कॅमेरापुढे सतत सांगितले जात आहे. राज्य सरकारने मराठ्यांची फसवणूक केली, असा सूर ते आळवत आहेत.

खरं तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली सर्व ताकद, पद, प्रतिष्ठा व प्रशासनाचे अधिकार पणाला लावून मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण मिळवून दिले, याचे थोडेसुद्धा कौतुक जरांगे-पाटील व त्यांच्या टीमला नसावे याचेच आश्चर्य वाटते. सग्यासोयऱ्यांना आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत निवडणुका घेऊ नयेत असा सल्ला त्यांनी निवडणूक आयोगाला दिला आहे. विधिमंडळ अधिवेशन कधी घ्यावे, याचा अजेंडा काय असावा, ठरावाची शब्दरचना कशी असावी याचेही सल्ले आंदोलकांचे नेते सकारला देत असतील, तर त्यांचे सल्लागार त्यांची फसवणूक करीत आहेत, असे म्हणावे लागेल.

दिवंगत नेते अण्णासाहेब पाटील यांनी अखिल भारतीय मराठा महासंघाची स्थापना केली. समाजाला आरक्षण मिळावे म्हणून त्यांनी मुंबईत १२ मार्च १९८२ रोजी मोर्चा काढला, तेव्हा बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री होते. सरकारने आश्वासन दिले, पण पुढे काहीच घडले नाही. यापूर्वी २०१४ व २०१९ मध्ये मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याच्या अशाच घोषणा झाल्या. पण ते आरक्षण न्यायालयात टिकले नाही. मग २०२४ मध्ये शिंदे सरकारने दिलेले आरक्षण न्यायालयात टिकेल का, हा कळीचा मुद्दा आहे. सरकारने मराठा आरक्षण देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये सर्वपक्षीय बैठक बोलावून व फेब्रुवारी २०२४ मध्ये विधिमंडळाचे विशेष अधिवेशन घेऊन एकमताने ठराव संमत करून घेतला. अर्थात हेच प्रयोग यापूर्वीही दोन वेळा झाले व न्यायालयीन कसोटीवर ते फसले म्हणूनच तिसऱ्या प्रयोगाविषयी समाजाच्या मनात धाकधूक आहे.

मराठा आरक्षण ही काही रस्त्यावरची लढाई नाही. सरकारला कोंडीत पकडून किंवा महाराष्ट्रातील जनतेला वेठीला धरून आरक्षण मिळवणे हा मार्ग नाही. शक्तिप्रदर्शन, जाळपोळ, पोलिसांवर दगडफेक करून प्रश्न सुटणार नाही. कायदेशीर लढाईत आरक्षण कसे टिकेल हे महत्त्वाचे आहे. पण त्याचे भान आंदोलकांना नाही. मराठा समाजाला दिलेल्या आरक्षणानंतर एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या वर जाणार असेल, तर ते न्यायालयात कसे टिकणार हा महत्त्वाचा मुद्दा आहे. मराठा समाज हा मागासवर्गीय आहे व असाधारण परिस्थितीमुळे त्यांना आरक्षण देणे आवश्यक आहे हे न्यायालयात सिद्ध करावे लागेल. रस्ता रोको किंवा एसटी बसेसची जाळपोळ किंवा तोडफोड करून आरक्षण कसे मिळणार? हिंसाचार करणारे लोक आमचे नव्हतेच असे सांगून आंदोलक नेत्यांना हात वर करणे सोपे आहे, पण सीसीटीव्हीत आज सर्व काही चित्रित होते आहे. जालन्याच्या दंगलीत ५८ पोलीस जखमी झाले, ते काय रस्त्यावर घसरून पडले होते का, याचे उत्तर कोणाकडे आहे?

महाराष्ट्रात रस्त्यावर शक्तिप्रदर्शन करून मराठा समाजाने मागण्या मान्य करून घेतल्या, तर गुजरातमध्ये पाटीदार, हरयाणात जाट, आंध्र प्रदेशात कुप्पू, राजस्थानात गुर्जर, हे समाज आरक्षणासाठी मुठी आवळूनच संधीची वाट पाहत आहेत. मोदी सरकारने आर्थिक प्रवर्गातून सर्वांसाठी १० टक्के आरक्षण देण्याची व्यवस्था केली. पण मराठा आंदोलकांचे नेते आम्हाला सग्यासोयऱ्यांसह सरसकट ओबीसीतूनच आरक्षण मिळाले पाहिजे, यासाठी हटून बसले आहे.

महाराष्ट्राचे सर्वाधिक मुख्यमंत्री मराठा झाले. आजचे मुख्यमंत्रीही मराठा आहेत. राज्यातील सहकारी कारखाने, संस्था, शिक्षण संस्था, यावर मराठा समाजाचे वर्चस्व आहे. जरांगे-पाटलांच्या नेतृत्वाखाली जे विराट मोर्च निघाले तसेच त्यांचे ठिकठिकाणी जे जंगी स्वागत केले गेले, तेथील भव्यता पाहून अनेकांचे डोळे दीपले. महाराष्ट्र शासनाच्या मराठा समाजासाठी असंख्य योजना कार्यान्वित आहेत. मराठा समाज वंचित राहू नये यासाठी शिंदे-फडणवीस-पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार दक्ष आहे. त्यांनी चर्चेचे दरवाजे सदैव खुले ठेवले आहेत. देशात ८० कोटी गरिबांना मोदी सरकारच्या वतीने मोफत रेशन दिले जात आहे. उज्ज्वला गॅस, परवडणारी घरे, शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट अर्थसहाय्य याचा लाभ सर्व समाजातील गरिबांना मिळतो आहे. तरीही सग्यासोयऱ्यांसह सरसकट आरक्षण ओबीसीतूनच मिळाले पाहिजे, यासाठी 'रास्ता रोको' करून जनतेला वेठीला धरण्याचे हत्यार का उपसले जात आहे?

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# जगात कुठेही जा परंतु मराठी भाषेला ( मातृभाषेला ) विसरू नका

**मराठी** भाषेचा गोडवा हा जगावेगळा असल्याचे जगजाहीर आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी साहित्याचा मानदंड वि.वा.शिरवाडकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो.या दिवसाला आगळे वेगळे महत्व असुन या दीवसाला जागतिक मराठी भाषा दिवस, मराठी भाषा गौरव दिन म्हणुनही साजरा केला जातो. मराठी भाषेतील अग्रगण्य व श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समिक्षक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ रोजी पुणे येथे झाला. त्यांनी अनेक माध्यमांच्या सहाय्याने मराठी भाषेचा जगभर प्रसार करून मराठी भाषेचे नाव लौकीक केले व गौरान्वीत केले. त्यामुळेच जगातील मराठी भाषीक २७ फेब्रुवारीला 'जागतिक मराठी दिवस' म्हणून साजरा करतात. मराठी भाषेचा गोडवा हा जगावेगळा आहे. मराठी भाषा सोज्वळ, निर्मळ आणि सोपी असल्याने कोणीही तीला सहज अवगत करू शकते. महाराष्ट्राची मातृभाषा ही भारतासह संपूर्ण जगाला वेगळाच आनंद प्रदान करीत असते. मराठी भाषेत महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आहे.याची जोपासना करण्याचे दायित्व संपूर्ण मराठी भाषीकांवर आहे. मराठी मांनसाचे कर्तव्य बनते की मराठी भाषा जगातील मानसाच्या हृदयात व रक्तात कसे रूजवीता येईल याकडे सर्वांचे लक्ष असले पाहिजे. कारण ही मराठी भाषेची भुमी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज,साधु-संत, थोर महात्मे, क्रांतीकारक, समाजसुधारक, जहालवादी, मवाळवादी यांच्या संकल्पनेतून व संस्कारातुनच मराठीचा उगम झालेला आहे. मराठी भाषेला जिवीत ठेवण्याचे काम वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी संपूर्ण ताकदीनिशी केले आणि जगभरात मराठीचा डंका वाजवीला.त्यामुळेच त्यांच्या जन्मदिनी म्हणजे २७ फेब्रुवारीला जागतिक मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो.या दिवसाला जगातील संपूर्ण मराठी भाषीक 'मराठी भाषा गौरव दिवस' म्हणून साजरा करतात. आपल्या पुर्वजांनी मराठी भाषेचा गौरव वाढविण्यासाठी व मराठीचा ठेवा मजबूत करण्यासाठी संपूर्ण ताकद लावली.परंतु आताची नवीन पिढी मराठीचे मुळ शब्दच विसरल्याचे दिसून येते. आई-बाबा, काका-काकु,मामा-मामी, आजी-आजोबा या शब्दाचा विसरपडुन मम्मी-पप्पा,आन्टी, डॅडी,ग्रॅडफादर-ग्रडमदर इत्यादी इंग्रजी शब्द मराठी भाषेत घर करतांना दिसत आहे.यामुळे मराठी भाषेतील अम्रृतवाणी नष्ट होवू शकते.याला नाकारता येत नाही.भारतात २८ राज्य ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. यामुळे भारताचा विचार केला तर १९५०० हुन अधिक मातृभाषा आहेत.त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेसह अनेक भाषा आहेत.त्या शिकाव्या व अवगत कराव्यात परंतु आपल्या मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी मुख्यत्वेकरून आजच्या पिढीने घेतली पाहिजे.आपल्यासाठी मराठी भाषा ही गंगेसारखी निर्मळ व तुळशीच्या वृक्षासारखी पवित्र आणि वटवृक्षासारखी अफाट भाषा आहे.त्यामुळे मराठी भाषेचा जेवढा प्रचार करतात येईल तेवढा केलाच पाहिजे. मातृभाषा मराठी ही आईची भूमिका बजावीत असते तर राष्ट्रभाषा हिंदी ही वडीलांची भुमिका पार पाडते.भारतात १९५०० पेक्षा अधिक मातृभाषा आहेत.परंतु या संपूर्ण भाषेमध्ये सोपी, सोज्वळ,मधुर आणि सहज अवगत होणारी एकमेव भाषा म्हणजे 'मराठी भाषा'त्यामुळे आजच्या नविन पिढीला मी कळकळीची विनंती करतो की आपल्या मायबोली मराठीला न विसरता त्याची जोपासना केली पाहिजे.यातच महाराष्ट्राचा आणि मराठी भाषीकांचा गौरव आहे.महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल असे घोषित झाले.त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे जेष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिनी साजरा केला जातो.मराठी भाषा महाराष्ट्रासाठीच नाही तर संपूर्ण जगाला सुशोभित करणारी भाषा आहे.मी नवीन पिढीला आग्रह करेल की कमीत कमी मराठी वृत्तपत्रे नेहमीच्या वाचनात आणावी यामुळे मराठी भाषेचा मान उंचावेल. त्याचप्रमाणे मराठी भाषेला जीथे-जीथे रूजवीता येईल तीथे-तीथे रूजवुन मराठी भाषेला प्रज्वलीत करण्याचे काम आधुनिक युगात नवीन पिढीने केले पाहिजे.

महाराष्ट्रातील कोणत्याही धर्माचा व्यक्ती असो किंवा पंथाचा व्यक्ती असो तो मराठीचा सन्मानच करतो. परंतु मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने मराठीला जगभरात कशी सुर्यासारखी तेजस्वी करता येईल याकडे संपूर्ण मराठी भाषीकांनी लक्ष दिले पाहिजे व मराठी भाषेचे नाव सुवर्ण अक्षरात कोरल्या गेले पाहिजे. याच मराठी भाषेने पोवाडा, कीर्तन, भजन, भारूड, लावनीच्या माध्यमातून इंग्रजांना सळोकीपळो लावले व समाज जागृतीचे काम केले. आपण ज्या मातीत जन्म घेतला आणि ज्या भाषेच्या बळावर लहाण्याचे मोठे झालो. अशा मराठी भाषेचा प्रवास न थांबता संपूर्ण जगात झाला पाहिजे. तेव्हाच मराठी भाषेची मान आणखी उंचावेल व कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल असे मला वाटते. ज्या मातीत आपण जन्म घेतला तेथील भाषेची पुजाअर्चना व्हायलाच पाहिजे कारण ती आपणासर्वांसाठी पुज्यनीय आहे. आज दक्षिण भारतातील मातृभाषेचा विचार केला तर ती इतरांसाठी बोलायला व वाचायला अवघड व कठीण वाटते. त्यामुळे या भाषांचा प्रसार जास्त होवु शकला नाही.परंतु आज मराठी भाषा जगभरात ऐकायला व पहायला मिळते ही आनंदाची व गौरवास्पद बाब आहे. महाराष्ट्रातील मराठी भाषेचा विचार केला तर भारतातील काणा-कोपऱ्यातील व्यक्ती सहज अवगत करीत असतो. त्यामुळे देशातील इतर राज्यांतील लोक महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. यामुळेच मुंबईला देशाच्या आर्थिक राजधानीचा दर्जा मिळाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मराठी भाषा सोपी, सोज्वळ, निर्मळ आणि शांत स्वरूपाची आहे. या वैभवशाली महाराष्ट्रातील मराठी भाषा संपुर्ण जगात आकाशातील चांदण्यांसारखी चमकायला पाहिजे.

मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने सर्वांना आग्रह करतो की माय मराठी,माझी मराठी, मी मराठी, मातृभाषा मराठी यापध्दतीने जोपासना व्हायलाच पाहिजे.कारण मराठी भाषा हा आपल्या पुर्वजांचा ठेवा आहे आणि ईश्वरी देण सुध्दा आहे.त्यामुळे मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त कसा करता येईल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे. कारण मराठी भाषेचा इतिहास, संस्कृती, वारसा याला उंच शिखरावर नेण्याची जबाबदारी युवा पिढीवर आहे. कारण जगात अनेक देशांमध्ये मराठी भाषा बोलली जाते.

महाराष्ट्रात जर आपण फिरायला निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर अंतरावर आपल्याला मराठी भाषेचा वेगवेगळा गोडवा दिसून येतो. कारण मराठीच्या प्रत्येक शब्दात मधुरता आणि सुसंगतपणा दिसून येतो. भारतासर संपूर्ण जगात सहज आणि सोपी भाषा असेल तर फक्त 'मराठी भाषा'. मराठी भाषा ही महाराष्ट्राचा राष्ट्रीय पक्षी मोराचा तुर्रा आहे तर जगाचा पीसारा आहे.त्यामुळे या गोडव्यामध्ये कुठेही खींडार पडणार नाही याची जबाबदारी भारतासह जगातील संपूर्ण मराठी भाषीकांनी घेतली पाहिजे.आज जगात मराठी भाषेचा वेगळा ठसा उमटवीण्याची वेळ आली आहे.कारण आज मराठी भाषा नदीच्या प्रवाहासारखी जलदगतीने जगात प्रवेश करीत आहे व तीला समुद्रासारखे अफाट करण्याचे दायित्व संपूर्ण मराठी भाषीकांवर आहे.त्यामुळे मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने आपण शपथ घेवुया की मराठी भाषा जगभर पसरवीण्याकरीता आम्ही कटीबद्ध आहोत.मराठी भाषेला माझा मानाचा मुजरा.

जगात वाढते प्रदुषण आणि निसर्गाचा होत असलेला ह्यास यामुळे पृथ्वीचे संतुलन दिवसेंदिवस डगमगत आहे. यामुळे भूकंप, सुनामी, अती उष्णता, अती थंडी, ग्लेशियर वितळने, समुद्राची पातळी वाढणे अशा अनेक भयावह घटना होत आहे. याला रोखण्यासाठी निसर्गाला वाचविणे गरजेचे आहे. याकरीता आजच्या दिवशी जगातील संपूर्ण मराठी भाषिकांनी मराठी भाषा दिवसाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखो झाडे लावल्या जातील. यामुळे सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण होईल व यामध्ये आपल्याला मराठी भाषेचा वेगळाच आनंद, गोडवा व सुगंध अवश्य दिसून येईल व जगात मराठी भाषेची आगळीवेगळी प्रतीमा पहायला मिळेल आणि जगात एक चांगला संदेश जाईल. जागतीक मराठी भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

सत्यमेव जयते MoRTH सड़क परिवहन एवं राजमार्ग मंत्रालय | महाराष्ट्र शासन | भारतीय रेल INDIAN RAILWAYS



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

## एक पाऊल
# विकसित भारत, विकसित महाराष्ट्राच्या दिशेने

## प्रधानमंत्री **नरेंद्र मोदी** यांच्या शुभहस्ते
### महत्वाकांक्षी प्रकल्पांचा शुभारंभ, अनावरण, राष्ट्राला समर्पण आणि लाभाचे वितरण

**पंतप्रधान किसान सन्मान निधी अंतर्गत देशातील 9 कोटी शेतकरी कुटुंबांना एकूण ₹ 21000 कोटी रुपयांची मदत**

**महाराष्ट्रातील विविध योजनांच्या लाभार्थ्यांना सुमारे ₹ 6900 कोटी रुपयांचे वितरण**

**राज्यातील सुमारे ₹ 5000 कोटी रुपयांच्या रस्ते, रेल्वे आणि सिंचन प्रकल्पांचे उद्घाटन/भूमिपूजन**

**वरोरा - वणी महामार्गावरील 18 कि.मी. चौपदरीकरण कामाचे लोकार्पण.**
- चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस, वणी, तडाळी, पडोली यांसारख्या विविध औद्योगिक क्षेत्रांना फायदेशीर.

**सलाईखुर्द - तिरोरा महामार्गावरील 42 कि.मी. काँक्रिटीकरण रस्त्याचे लोकार्पण. (रु. 378 कोटी)**
- नागजिरा अभयारण्याच्या पर्यटनाला चालना.
- गोंदिया ते नागपूर प्रवासाच्या वेळेत 1 तासाची कपात.

**साकोली - भंडारा जिल्हा सीमेपर्यंतच्या 55.80 कि.मी. दुपदरी रस्त्याचे लोकार्पण. (रु. 291 कोटी )**
- या भागातील उद्योगांना फायदा.
- वेळ आणि इंधनाची बचत होईल तसेच रस्ता सुरक्षा वाढेल.

**पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत विदर्भ आणि मराठवाड्यातील 6 प्रकल्पांचे लोकार्पण. (रु. 1683 कोटी)**
- आतापर्यंत पूर्ण झालेल्या प्रकल्पातून 2.41 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण.
- विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशातील एकूण अकरा प्रकल्पांचा समावेश.

**बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत विदर्भ आणि मराठवाड्यातील 45 सिंचन प्रकल्पांचे लोकार्पण (रु.1180 कोटी)**
- आतापर्यंत पूर्ण झालेल्या प्रकल्पातून 51 हजार हेक्टरची सिंचन क्षमता.
- फक्त महाराष्ट्रात ही योजना राबवण्यात येत आहे.

**अहमदनगर - बीड - परळी रेल्वे मार्गावरील न्यू आष्टी - अंमळनेर (32.84 कि.मी) टप्प्याचे लोकार्पण (रु. 645 कोटी) व अंमळनेर - न्यू आष्टी स्टेशनपर्यंत विस्तारित रेल्वे सेवेचा शुभारंभ**
- बीड जिल्ह्यातील नागरिक व कामगार वर्गाला लाभदायक.
- आष्टी हे देशातील इतर भागाशी रेल्वे सेवेने जोडले जातील.

**वर्धा- यवतमाळ- नांदेड रेल्वे मार्गावरील वर्धा - कळंब (जि. यवतमाळ) या टप्प्याचे(39 कि.मी.) लोकार्पण (रु. 675 कोटी) व नवीन रेल्वे गाडीचा शुभारंभ**
- वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांतील दळणवळण गतिशील होणार.
- यवतमाळ जिल्ह्यात प्रथमच ब्रॉडगेज रेल्वे सेवा.

**मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान अंतर्गत 5.50 लाख महिला बचत गटांना रु. 825 कोटी फिरत्या निधीचे वितरण.**
- स्वयंसहाय्यता समूहांना अतिरिक्त खेळते भांडवल देण्यासाठी 913 कोटी रुपयांची विशेष तरतूद.

**इतर मागासवर्ग प्रवर्गासाठी मोदी आवास योजनेचा शुभारंभ.**
- येत्या 3 वर्षात 10 लाख घरे बांधणार.
- 2.5 लाख लाभार्थ्यांना रु. 375 कोटींच्या पहिल्या हप्त्याचे ऑनलाईन वितरण.

**आयुष्मान भारत अंतर्गत महाराष्ट्रात 1 कोटी आयुष्मान कार्डचे वितरण.**
- 3 लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात कार्डचे वितरण.
- गरिबांसाठी वर्षाला रुपये 5 लाख पर्यंत मोफत उपचार.
- चाचणी, उपचार आणि औषधे मोफत.

**पीएम किसान सन्मान निधीच्या 16 व्या हप्त्याचे थेट बँक खात्यात वितरण.**
- देशातील 9 कोटी शेतकरी कुटुंबांना एकूण 21 हजार कोटी रुपयांचे वितरण.
- राज्यातील सुमारे 88 लाख शेतकरी कुटुंबांना 1969 कोटी रुपयांचे वितरण.
- आधार लिंक बँक खात्यात लाभांचे डिजिटल हस्तांतरण.

**यवतमाळ येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुतळ्याचे अनावरण.**

**नमो शेतकरी महासन्मान निधी अंतर्गत दुसऱ्या आणि तिसऱ्या हप्त्याचे वितरण.**
- राज्यातील सुमारे 88 लाख शेतकरी कुटुंबांना 3800 कोटी रुपयांचा लाभ.
- आधार लिंक बँक खात्यात लाभांचे डिजिटल हस्तांतरण.

**बुधवार, 28 फेब्रुवारी 2024**

**दुपारी 4:45 वाजता**

**डोरली, नागपूर रोड, यवतमाळ, महाराष्ट्र**



/MahaDGIPR | mahasamvad.in | MAHARASHTRADGIPR | Live on : DD NEWS

# विद्यापीठ प्रशासनाच्या विरोधात विद्यार्थी संघटना आक्रमक

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात काही दिवसांपूर्वी तोंडाला भगवे फडके बांधून धुडगूस घालणाऱ्यांवर कारवाईची मागणी करत आंदोलन करणाऱ्या विविध विद्यार्थी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांवर प्रशासनाने गुन्हे दाखल केले. तसेच परिसरात आंदोलन करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असल्याचे पत्रक काढण्यात आले आहे. याच्या निषेधार्थ विद्यार्थी संघटनांनी आज सकाळी प्रशासकीय इमारतीसमोर जोरदार आंदोलन केले. यावेळी टोकाचे पाऊल उचलत रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचे नेते सचिन निकम यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने पुढील अनर्थ टळला.

१४ फेब्रुवारी व्हॅलेंटाईन डे रोजी विद्यापीठात तोंडाला भगवे फडके बांधून काही तरुणांनी धुडगूस घातला होता. त्यांच्यावर कारवाईसाठी विविध विद्यार्थी संघटनांनी कुलगुरू दालनासमोर आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे त्यांच्यावर प्रशासनाने गुन्हे नोंदवले. त्याच्या निषेधार्थ २७ फेब्रुवारी रोजी आंदोलन करण्याची परवानगी बेगमपुरा पोलिसांकडे विद्यार्थी नेते सचिन निकम यांनी मागितली होती. मात्र, पोलिसांनी विद्यापीठ प्रशासनाने परिसरात आंदोलन करण्यास बंदी घातलेली असल्यामुळे परवानगी देण्यास नकार दिला. परवानगी नाकारल्यानंतरही विविध विद्यार्थी संघटनांनी माघार न घेता आज सकाळी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर धडक दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची आज अधिसभेची बैठक सुरू आहे. यात २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. बैठक सुरू असतानाच दुपारी बारा वाजेच्या दरम्यान रिपब्लिकन विद्यार्थी सेना, सम्यक विद्यार्थी आंदोलन, पँथर्स रिपब्लिकन विद्यार्थी आघाडी एसएफआय, सत्यशोधक विद्यार्थी संघटना, दामिनी महिला संघर्ष समिती, युवक कॉंग्रेस आदी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी मुख्य इमारतीसमोर विद्यापीठ प्रशासनाचा निषेध करत आंदोलन सुरू केले. सचिन निकम, गुणरत्न सोनवणे, दिक्षा पवार, जयश्री शिर्के, अतुल कांबळे, प्रशांत बोराडे, संदिप तूपसमुद्रे, प्रा.देवानंद वानखेडे, जयपाल सुकाळे, लोकेश कांबळे, अमरदिप अवचार, विकास रोडे, अमरदिप हिवराळे, जयेश पठाडे, भीमराव वाघमारे, सुमेध बनकर, अक्षय जाधव, रत्नदीप रगडे, मंथन गजहंस, नारायण खरात, मनीषा बल्लाळ, निशिकांत कांबळे, कुणाल भालेराव, सागर ठाकूर आदींनी विद्यापीठ प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

कुलगुरू, कुलसचिव यांच्या हिटलरच्या वेशातील प्रतीकात्मक प्रतिमा आंदोलकांनी आणल्या होत्या. विद्यापीठाच्या परिपत्रकाची होळी करून आंदोलकांनी जोडे मारून प्रतीकात्मक प्रतिमांना दहन केले. दरम्यान, सिनेट सदस्य प्रा.सुनील मगरे, व्यवस्थापन परिषद सदस्य दत्ता भांगे, सुभाष राऊत, हरिदास सूर्यवंशी यांनी आंदोलकांच्या शिष्टमंडळाला प्र. कुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे यांच्यासोबतच्या चर्चेसाठी बोलावून घेतले. मात्र, ही चर्चा निष्फळ ठरली. प्रशासनाने आंदोलन दडण्यासाठी ही खेळी केली असल्याचा आरोप करत आंदोलक विद्यार्थी प्रशासकीय इमारती बाहेर आले. याचवेळी बाबासाहेबांच्या नावाने असणाऱ्या विद्यापीठाची प्रतिमा मलिन करण्यात येत आहे. येथे एकाधिकारशाही निर्माण होणे हा महामानवाच्या नावाचा अवमान होत असल्याचा संताप व्यक्त करत आंदोलकांपैकी एक सचिन निकम याने अंगावर पेट्रोल ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत निकम यांना ताब्यात घेतल्याने पुढील अनर्थ टळला.

# वैजापूरातील पालिकेच्या मौ. आझाद विद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काव्य गायन

वैजापूर, दि. २७ (प्रतिनिधी) - वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म २७ फेब्रुवारी, १९१२ रोजी झाला. त्यांनी मराठी भाषेच्या समृद्धीसाठी व विकासासाठी मराठी भाषेत विपुल लेखन केले, मराठी भाषा महाराष्ट्र जनतेच्या मना, मनात रुजविली म्हणून दरवर्षी २७ फेब्रुवारी, हा दिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून संपूर्ण राज्यभर विविध उपक्रमांनी साजरा करतात. याचा एक भाग म्हणून मंगळवार (ता.२७) रोजी येथील पालिकेच्या मौ. आझाद विद्यालयात मुख्याध्यापिका नीता पाटील यांच्या उपस्थितीत मराठवाड्याचे जेष्ठ साहित्यिक व पाठ्य पुस्तकात ज्यांच्या कविता अभ्यासक्रमात आहेत असे वैजापूर चे कवी धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत सकाळी कुसुमाग्रज यांना अभिवादन करण्यात आले, शालेय विद्यार्थ्यांनी मायबोली मराठीच्या महिमा व गोडवा व्यक्त करणाऱ्या कविता सादर केल्या. धोंडीरामसिंह राजपूत यांनी कुसुमाग्रज यांच्या साहित्य कृतीवर प्रकाश टाकून आपल्या काही कविता सादर करून



मराठी मायबोलीचा महत्ती विशद केली. केंद्र सरकारने मराठी भाषेला राजदर्जा द्यावा व सरकारी, खाजगी सर्व परिपत्रक मराठीत काढून मायबोली महाराष्ट्रीयन लोकांच्या मना-मनात रुजवावी अशी मागणी केली. या प्रसंगी शिक्षक सुभाष गोमलाडू, विजय तगरे, सुनीताताई वसावे, सौ.ताराताई होलप तसेच वैशाली शेलार, सुवर्णा बोर्डे, राजश्री बंड, बी.बी.जाधव यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यात सहकार्य केले.

# छत्रपती संभाजीनगर येथे स्वा.सावरकरांच्या अजरामर गीतांचा कार्यक्रम संपन्न!

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - दि. २६ फेब्रुवारी स्वा. सावरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त ‘अनादि मी..अनंत मी’ हा ‘स्वराविष्कार’ म्हणचेच स्वा.सावरकरांच्या असिम प्रतिभेतून साकारलेल्या अजरामर गीतांचा कार्यक्रम मराठवाडा महसूल प्रबोधिनी सभागृह छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाला. स्वातंत्र्यवीर सावरकर प्रेमी मित्रमंडळ छत्रपती संभाजीनगर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर कलामच माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



‘संगीतरूप स्मरण ‘या संकल्पनेतून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना अभिवादन करण्यासाठी या कार्यक्रमाची सुरुवात स्वातंत्र्यवीर सावरकर व छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्रकल्प प्रमुख श्री. विवेक घाणेकर, संकल्पना प्रमुख व निवेदिका प्रा.स्नेहल पाठक साहित्यिक मंगलाताई वैष्णव व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

या प्रसगी सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले पाहुणे प्रा.उत्तम काळवणे, प्रा.अभिजीत धर्माधिकारी, प्रा. विजय रामदासी, सौ. अमृता पालोदकर, सौ.अलका भाले, सौ. संध्या स्नेही तसेच जालना येथील श्री. कुलकर्णी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सर्व प्रथम संस्थेचे अध्यक्ष श्री भाऊ सुरडकर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला व उपक्रमांची माहिती दिली. तसेच श्री विवेकजी घाणेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले व संस्थेच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर कलामच माजलगाव यांच्या ग्रुपने सावरकर लिखीत अजरामर गीतांचा अतिशय सुंदर असा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. स्नेहल ताई पाठक यांनी त्यांच्या सुंदर अश्या शैलीत केले. साहित्यिक, माहितीपूर्ण व सावरकरांच्या अनेक आठवणी सांगत सर्वांना मंत्रमुग्ध केले.

सर्वप्रथम छत्रपती शिवाजीमहाराज यांच्यावर लिहलेल्या आरतीने सुरवात केली. त्यानंतर पोवाडा, फटका, गझल या सावरकरांच्या साहित्यातील अनेक वेगवेगळे त्यांच्या माहितीपूर्ण विवेचनातून सादर करण्यात आले.. त्यानंतर अतिशय उत्स्फुर्तपणे सावरकर यांचे अजरामर गीत’ जयोस्तुते, सागरा प्राण तळमळला, अनादि मी, अनंत मी, प्रभो शिवाजी राजा यांचे सादरीकरण श्री. संजय कुलकर्णी, श्री. श्रीराम देशपांडे श्री. लक्ष्मीप्रसाद पटवारी, श्री. कुणाल कुलकर्णी व इतर सहभागी कलाकार यांनी केले. अतिशय भारावलेल्या वातावरणात या कार्यक्रमाची सांगता ही ‘हे अधम रक्त रंजिते सुजण पुजिते श्री स्वतंत्रते .. जयोस्तुते’ या गीताने आदरांजली वाहून केली. या कार्यक्रमास खास उपस्थित शहरातील प्रसिद्ध संगित तज्ञ श्री. विजय देशमुख सर यांनी सर्व कलाकारांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.सृष्टी सराफ केले तसेच आभार प्रदर्शन सौ.डोमाले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी श्री. भाऊ सुरडकर सर, श्री. किरण सराफ, श्री. सुभाष कुमावत, श्री. विजय जहागीरदार यांनी परिश्रम घेतले.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनातील महायुती सरकारचे टॉप १० निर्णय

**१. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे भुसंपदान पूर्ण**

भारतातील पहिली मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे भुसंपदान पूर्ण झालं आहे. सोलापूर तुळजापूर धाराशिव तेथे रेल्वे मार्गासाठी भुसंपादन सूरू आहे. जालना यवतमाळ पुणे लोणावळा रेल्वे मार्गासाठी ५० टक्के रक्कम सरकारं देइल. ही चौथी मार्गिका असणार आहे. जालना-यवतमाळ-पुणे-लोणावळा रेल्वे मार्गासाठी ५० टक्के रक्कम सरकारं देईल, ही चौथी मार्गिका असणार आहे. सहा वंदे भारत एक्सप्रेस सुरु करण्यात आल्या आहेत.

**२. वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू पालघरपर्यंत, ७५०० किमीची रस्त्याची कामे**

७ हजार ५०० किमीची रस्त्याची कामे हातात घेण्यात येणार आहेत. सार्वजनिक बांधकाम १९ हजार कोटी रुपये देण्यात येत आहेत. ?वर्सोवा वांद्रे सागरी सेतू पालघरपर्यंत केला जाणार आहे. रत्नागिरी भागवत बंदरसाठी ३०० कोटी रुपये, मिरकरवाडा बंदर नव्याने करण्यात येतं आहे. ?सात हजार किलोमीटर लांबीचे रस्ते आणखी सुरु करणार आहे.

**३. पेन्शनधारकांना दिलासा**

संजय गांधी निराधार योजनेत १००० वरुन १५०० रुपये पेन्शन दिली जाणार आहे. प्रत्येक तालुक्यात एक शववाहिका उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. ?संत गाडगेबाबा महामंडळ स्थापन केलं जाईल.

**४. रेडीओ क्लब जेटीसाठी २२७ कोटी**

रेडीओ क्लब जेटीसाठी २२७ कोटी रुपयांच्या काम सुरु होणार आहे. मिहान प्रकल्पासाठी १०० कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. सामान्य प्रशनास विभागास १ हजार कोटी रुपये प्रस्तावित आहे. वस्त्रोद्योग धोरण अंतर्गत शिधा वाटप करताना एका महिलेस एक साडी देण्याचं काम सुरू आहे.

**५. दवोसमध्ये १९ कंपन्यांसोबत करार**

जानेवारी २०२४ मध्ये दवोस येथे १९ कंपन्यांसोबत करार झाले आहेत, अशी माहिती अर्थमंत्र्यांनी दिली आहे.

**६. पाच इंडस्ट्रियल पार्क, 'मेक इन इंडिया'साठी १९६ कोटींच्या निविदा**

निर्यात वाढीसाठी ५ इंडस्ट्रियल पार्क तयार करण्यात येत आहे. 'मेक इन इंडिया' धोरणांतर्गत १९६ कोटी रुपये निवेदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे. या ठिकाणी मॉल करण्यात येणार आहे. राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलीयन डॉलर करण्यासाठी आवश्यक ध्येयधोरणांची अर्थसंकल्पातून अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**७.आठ लाख ५० हजार नवीन कृषीपंप बसवणार**

शेतकऱ्यांसाठी सौर आणि कृषीपंप योजना राबवण्यात येणार, ८ लाख ५० हजार नवीन कृषीपंप बसवण्यात येणार आहेत. शेळी मेंढी वराह योजनेअंतर्गत १२९ प्रकल्पांचा प्रस्ताव सरकाराला देण्यात आला आहे. येत्या ३ वर्षात १५५ प्रकल्पांची दुरुस्ती करण्यात येईल त्यासाठी १५ हजार कोटी रुपयांची गरज आहे.

**८. एक लाख महिलांना रोजगार, ५००० पिंक रिक्षा**

४० टक्के अपारंपारिक उर्जा राबविणार आहे. ३७ हजार आंगणवाडींना सौर उर्जा दिली जाणार आहे. एक लाख महिलांना रोजगार दिला जाईल. आंगणवाडी सेविकांची १४ लाख पद भरण्यात आली. ४४ लाख नुकसान झालेल्या शेतकरी यांना तीन हजार कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. पाच हजार पिंक रिक्षा महिलांसाठी दिल्या जाणार आहे.

**९. मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजना**

महिला आणि बालकल्याण विभागाला ३१०७ कोटी रुपयांची तरतूद देण्यात आली आहे. मुलींना १८ वर्षांपर्यंत विविध टप्प्यांमध्ये एक लाख एक हजार रुपये निधी देण्यात येईल.

**१०. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भरीव तरतूद**

खेळाडूंसाठी 'मिशन लक्षवेध' योजनेअंतर्गत राज्य स्तरावर उच्च कामगिरी केंद्र, विभागीय स्तरावर क्रिडा उत्कृष्टता केंद्र, जिल्हा स्तरावर क्रिडा प्रतिभा विकास केंद्र अशी खेळाडंसाठी त्रिस्तरीय प्रशिक्षण यंत्रणा उभारण्यात येणार आहे. आशियाई स्पर्धेत पदक मिळवणाऱ्या राज्यातील खेळाडूंच्या पारितोषिकामध्ये १० पट वाढ करण्यात आली आहे. सुवर्णपदाकासाठी एक कोटी रुपये रौप्य पदकासाठी ७५ लाख रुपये आणि कांस्य पदकासाठी ५० लाख रुपयांची पारितोषिके देण्यात येत आहेत.

# जितो लेडीज विंगच्या क्रीडा स्पर्धेला प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- जितो लेडीज विंग छत्रपती संभाजीनगर स्पोर्ट्स गाला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वॉलमार्टच्या शेजारी बाउन्सर टर्फ, पैठण रोड येथे आयोजित करण्यात आला होता. सकाळी ८ वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. रश्मिका संचेती आणि पूजा गांधी यांच्या नवकार महामंत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमांस प्रायोजक बाकलीवाल अँड सन्स, टी-शर्ट आणि कॅप प्रायोजक रविजी खिंवसरा खिंवसरा प्रॉपर्टीज, फूड प्रायोजक गौतम पगारिया व एनर्जी ड्रिंकचे प्रायोजक कुणालजी सेठी हे होते

या उत्सवात १०० हून अधिक महिला सहभागी झाल्या होत्या. उद्घाटन प्रायोजक व मान्यवर हस्ते करण्यातआले..रोम व्हीपी रवी खिंवसरा चॅप्टरचे मुख्य सचिव दिनेश मुथ्था कोषाध्यक्ष देवेंद्र जैन अमित खाबिया यांनी प्रेरित केले.रोम व्हीपी रवि खिंवसरा यांनी स्पोर्ट्स फिटनेस व त्याचे महत्त्व याविषयी आपले मत मांडले .अध्यक्षा डिंपल पगारिया यांनी आगामी कार्यक्रमांबद्दल सर्वांचे स्वागत केले. ५ टीम बनवण्यात आल्या होत्या यामध्ये फिटनेस एन झुंबा कलाकार चेतन पाटील यांनी झुंबा एन एरोबिक्सने सर्वांचे मनोरंजन केले. अँकर पूजा यानी आमच्या शाळेच्या दिवसात घेऊन गेली.. सर्व सभासदांना टीशर्ट आणि टोप्या देण्यात आल्या. रिले रेस, सॅक रेस, स्टिक रेस कोन रेस रन हॉप एन बर्स्ट बलून अशा अनेक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक लता कांकरिया व अनुजा जैन यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाने सर्वांना तंदुरुस्ती व आरोग्यासाठी प्रोत्साहित केले. सर्व समिती सदस्य आणि संयोजक डिंपल पगारिया अध्यक्ष संगिता कोटेचा, सोनल जेल्मी उपाध्यक्ष, प्रिया मुथ्था मुख्य सचिव, पल्लवी ओस्तवाल, राखी जैन सहसचिव व सुरुची मुगदिया खजिनदार सर्वांना खेळण्यासाठी आणि जिंकण्यासाठी प्रोत्साहित केले. मुख्य सचिव प्रिया मुथ्था यांनी सर्वांचे आभार मानले आणि आभार मानले

(पान १ वरुन)

## राज्याच्या अंतरिम अर्थसंकल्पात...

श्रीनगर येथेही महाराष्ट्र भवन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची घोषणा अजित पवार यांनी केली. यासाठी त्या-त्या राज्यांनी चांगली जागा उपलब्ध करुन दिली असल्याची महिती अजित पवार यांनी दिली. याशिवाय या जागांसाठी ७७ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांसाठी सौर आणि कृषीपंप योजना राबवण्यात येणार, ८ लाख ५० हजार नवीन कृषीपंप बसवण्यात येणार आहेत. शेळी मेंढी वराह योजनेअंतर्गत १२९ प्रकल्पांचा प्रस्ताव सरकाराला देण्यात आला आहे. येत्या ३ वर्षात १५५ प्रकल्पांची दुरुस्ती करण्यात येईल त्यासाठी १५ हजार कोटी रुपयांची गरज आहे.

४० टक्के अपारंपारिक उर्जा राबविणार आहे. ३७ हजार आंगणवाडींना सौर उर्जा दिली जाणार आहे. एक लाख महिलांना रोजगार दिला जाईल. आंगणवाडी सेविकांची १४ लाख पद भरण्यात आली. ४४ लाख नुकसान झालेल्या शेतकरी यांना तीन हजार कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. पाच हजार पिंक रिक्षा महिलांसाठी दिल्या जाणार आहे. तसेच महिला आणि बालकल्याण विभागाला ३१०७ कोटी रुपयांची तरतूद देण्यात आली आहे. मुलींना १८ वर्षांपर्यंत विविध टप्प्यांमध्ये एक लाख एक हजार रुपये निधी देण्यात येईल.

खेळाडूंसाठी मिशन लक्षवेध योजनेअंतर्गत राज्य स्तरावर उच्च कामगिरी केंद्र, विभागीय स्तरावर क्रिडा उत्कृष्टता केंद्र, जिल्हा स्तरावर क्रिडा प्रतिभा विकास केंद्र अशी खेळाडंसाठी त्रिस्तरीय प्रशिक्षण यंत्रणा उभारण्यात येणार आहे. आशियाई स्पर्धेत पदक मिळवणाऱ्या राज्यातील खेळाडूंच्या पारितोषिकामध्ये १० पट वाढ करण्यात आली आहे. सुवर्णपदाकासाठी एक कोटी रुपये रौप्य पदकासाठी ७५ लाख रुपये आणि कांस्य पदकासाठी ५० लाख रुपयांची पारितोषिके देण्यात येत आहेत.

## जरांगेंशी देणेघेणे नाही मात्र...

जर कोणी बोलले तर, तुमच्या पाठीशी देवेंद्र फडणवीस राहतील. जरांगे पाटील यांच्या संदर्भात मला घेणं देणं नाही, मात्र त्यांचा बोलवता धनी कोण आहे हे शोधल जाईल. औरंगाबाद याठिकाणी वॉर रुम कोणी सुरु केली, याची सखोल चौकशी होईल, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, मराठा अधिवेशनाचे पडसाद राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशात देखील उमटत असल्याचे चित्र आहे. आज अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मराठा आंदोलनावरून भाजप नेते आशिष शेलार आणि राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यात खडाजंगी झाली. महाराष्ट्र बेचिराख होण्याची भाषा जरांगेंनी केली असून त्यांची चौकशी व्हावी अशी मागणी करत आशिष शेलार आक्रमक झाले तर जरांगे यांना चिथवण्याचा प्रयत्न कोणी केला, त्यांचे आंदोलन कुणी पेटवले असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे.

## जरांगेंच्या मागण्या सतत बदलत...

पद्धतीने बोलणं हे शोभत का? मनोज जरांगे यांची भाषा कार्यकर्त्याची भाषा नाही, ही भाषा राजकीय भाषा आहे. जाती-जातीत भांडण करण्याचा प्रयत्न आहे, हे लक्षात आलं. जी अधिसूचना काढण्यात आली, त्यावर साडे सहा लाख हरकती आल्या आहेत, असं मुख्यमंत्री शिंदेनी सांगितलं.

मनोज जरांगे यांची भाषा कुणाची आहे, यावर बोलणार नाही. कायद्यापेक्षा कुणीही मोठं नाही, कायदा सर्वांना पाळावा लागेल. पंतप्रधान मोदींना महाराष्ट्रात येऊं देणार नाही, असं ते म्हणाले. तुमच्या गाड्यांवर हल्ला झाला तर, सरकार तुमच्या पाठीशी उभा राहील. नारायण राणे यांना ताटावरुन उचललं. एवढं काय मोठा गुन्हा होता. नवनीत राणाला हनुमान चालिसा वाचायची होती तर, १२ दिवस जेलमध्ये टाकलं, कंगना राणावतच घर तोडलं, असं म्हणत शिंदेंनी तत्कालिन महाविकास आघाडी सरकारवर टीका केली आहे.

## कर नाही त्याला डर कशाला,....

वाटलेच तर सलाईन उचलून चौकशीला येतो. देवेंद्र फडणवीस हे मराठ्यांविरोधात काम करणारच आणि तोपर्यंत आम्ही बोलतच राहणार, असे म्हणत फडणवीस यांच्याबद्दल आपली भूमिका ठाम असल्याचे जरांगे यांनी म्हंटले आहे.

तसेच मी कुठे चुकत नाही आणि कुठेच गुंतू शकत नाही. मी तुमच्या एसआयटीला घाबरत नाही. मला सगळ्यात जास्त फोन तुमचेच आले असून, फेस कॉलवर काय काय बोललेत मी पण उघड करतो. मी मराठ्यांचे काम करतोय. ते सत्तेचा वापर करणार आहे. तुरुंगात घेऊन जा, चौकशी लावा, असे जरांगे म्हणाले.

तसेच मी मराठा समाज आणि सरकारमधील काटा आहे. त्यांना सरकार आणायचे आहे म्हणून मला ते गुंतवणारच. मी कोणत्याही चौकशीला सामोरे जायला तयार आहे. माझ्याकडे कोणाचेच पैसे नाहीत. उलट तुमचेच फोन जास्त आलेले आहेत. ज्याला कर नाही त्याला डर कशाला अशी आक्रमक प्रतिक्रिया मनोज जरांगे यांनी दिली आहे.

सरकारला शेवटची विनंती, मराठ्यांचा रोष अंगावर घेऊ नका. मराठा समाजातील वकिलांना विनंती आहे ज्यांच्यावर गुन्हे दाखल झालेत त्यांच्यासाठी लढा. वकिलांनी मोफत लढावे, न्यायालयातून जामीन करून घ्या. देवेंद्र फडणवीस हे मुद्दाम करतायेत. तुम्ही सगळ्यांनी शांततेत राहा. मी बघतो काय करायचे असा इशाराही मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा दिला आहे.

## जरांगेंच्या आंदोलनाशी संबंध नाही...

बरेच सहाकारीही तिथेच थांबतात, असेही राजेश टोपे यावेळी बोलताना म्हणाले.

आंदोलनाला हिंसक वळण लागावे, असं आम्ही कधीच करणार नाही. अनेक लोक कोणतीही माहिती नसताना बोलत आहेत. आज तिथे प्रत्येक पक्षातील लोक जात आहेत. ते पक्षाचे नाही तर समाजाचे आंदोलन आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही आमची इच्छा आहे. हिंसेला कधी प्रोत्साहन देणार नाही, असे राजेश टोपे यांनी स्पष्ट केले.

## शेतकऱ्यांना भरघोस धनलाभ,....

योजने अंतर्गत रू. २०००/ तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत दुसरा व तिसरा हप्ता मिळून रू. ४०००/ असा एकुण रू. ६०००/ चा लाभ राज्यातील सुमारे ८८ लाख पात्र शेतकरी कुटुंबांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येईल. केंद्र शासनाने २८ फेब्रुवारी २०२४ हा दिवस संपूर्ण देशभर पीएम किसान उत्सव दिवस म्हणून साजरा करण्याचे निर्देश दिले आहे.

## महायुती सरकारचे बजेट म्हणजे...

माहीत आहे. आजचा अंतरिम अर्थसंकल्प पाहिला तर निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हा बजेट मांडला आहे. अवकाळी पावसाचा राज्याला फटका बसला आता या घोषणाचा फटका बसेल की काय अशी अवस्था आहे. मुंबईत रस्ते घोटाळा आहे, टेंडर वर टेंडर लोक काढत आहेत.

महायुती सरकारचा बजेट म्हणजे यांचे कंत्राटदार मित्र जोमात आणि शेतकरी कोमात असा हा अर्थसंकल्प आहे. नवीन रस्त्याच्या घोषणा, पहिल्या घोषणाचे काय असा प्रश्न आहे. मराठी भाषा भावनांचा आम्ही उल्लेख केला तोच आहे. पुढच पाठ मागच सपाट, अशी सरकारची अवस्था आहे, असेही उद्धव ठाकरे यांनी नमूद केले. आमचे सरकार यांनी पाडून एक दीड वर्ष होऊन गेले. देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रस्ताव पाठवला असेल नको त्या चौकशा करण्यापेक्षा प्रस्ताव पाठवा ना, असेही ठाकरे यावेळी म्हणाले.